सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,

## रायगड–अलिबाग.





# क्रीडा स्पर्धा मार्गदर्शिका २०१८-१९



# मनोगत



महाराष्ट्र राज्याला क्रीडा संस्कृतीचा मोठा वारसा असून क्रीडा धोरण राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. क्रीडा विषयक पायाभूत सोयी–सुविधा निर्माण व विकसित करण्यामध्ये महाराष्ट्र राज्य देशात अग्रेसर आहे. राज्य शासनाने आंतरराष्ट्रीय क्रीडा जगातील घडामोडींचा वेध घेवून भविष्यात करावयाच्या कार्यप्रणाली संबंधी क्रीडा धोरण–२०१२ जाहीर करुन त्याची अंमलबजावणी सुरु कलेली आहे. क्रीडा धोरणाचे फलीत म्हणून आंतरराष्ट्रीय पातळीवर आयोजित होणाऱ्या राष्ट्रकुल, आशियाई व ऑलिंपीक स्पर्धांमध्ये सहभागी खेळाडूंची संख्या वाढत आहे. सन २0२0 या वर्षी आयोजित होणाऱ्या ऑलिंपीक स्पर्धेत महाराष्ट्रातील खेळाडूंना किमान २0 पदके मिळविण्याचे उदि्ष्ट डोळ्यासमोर ठेवून मिशन ऑलिंपीक २०–२० रोजनेची आखणी करुन त्याची कालबध्द अंमलबजावणी सुरु केलेली आहे. या योजने अंतर्गत राज्यातील उद्योन्मुख खेळाडूंना देशाबाहेर प्रशिक्षण, दर्जेदार क्रीडा साहित्य व सकस आहार यासाठी भरघोस अर्थसहाय्य देण्यात येत आहे.

राज्यात क्रीडा संस्कृतीची जोपासना व जास्तीत जास्त आंतरराष्ट्रीय पदक विजेते खेळाडू निर्माण करण्याच्या अनुषंगाने पायाभुत क्रीडा सुविधा, खेळाडूंसाठी भरघोस अर्थसहाय्य व रोख पारितोषिके, क्रीडा संस्था व संघटनांना आर्थिक सहाय्याच्या योजना क्रीडा धोरणाच्या माध्यमातून राबविण्यात येत आहेत. राज्याचे नाव उज्वल करणाऱ्या खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती, ५ टक्के आरक्षण, पुरस्कार या माध्यमातून प्रोत्साहन व प्रेरणा देवून त्यांचा यथोचित गौरव करण्यात येत आहे. क्रीडा कामगिरी प्रगत करणे ही अखंड चालणारी प्रक्रीया असून खेळाला क्रीडा वैधानिकशास्त्राची मोठी जोड आहे. या क्षेत्राला पुढे नेण्यासाठी खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक, क्रीडा शिक्षक, कुशल संघटक, क्रीडा मंडळे, एकविध खेळ संघटना तसेच प्रशासन यांचा समन्वय असणे आवश्यक आहे.

क्रीडा विकासाबरोबरच राष्ट्रीय व सामाजिक विकासाच्या प्रवाहात युवा शक्तीचा सहभाग अत्यंत महत्वाचा आहे. युवांच्या व्यक्तीमत्वाचा विकास करुन त्यांच्या सुप्त गुणांना वा देण्यासाठी तसेच युवांना सर्व क्षेत्रात सक्षम करण्यासाठी राज्याचे स्वतंत्र युवा धोरण जाहिर करुन त्याची अंमलबजावणीही करण्यात येत आहे. युवा धोरणाच्या अंतर्गत युवकांच्या सक्षमीकरणासाठी राज्य युवा प्रशिक्षण केंद्र, युवकांच्या अंगी असलेल्या कलाविषयक गुणांना वाव देण्यासाठी जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर युवा महोत्सव, जिल्हा व राज्य स्तरावर युवा पुरस्कार, युवकांच्या सोयीसाठी महसुली विभागाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी युवा वसतीगृहांची उभारणी इ. योजना राबविण्यात येत आहेत.

जिल्हा क्रीडा परिषदेच्या वतीने सन २०१८–१९ या शैक्षणिक वर्षात विविध वयोगटातील मुले व मुलींसाठी जवळपास ४५ खेळांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. गत वर्षापासून स्पर्धांचे आयोजन पारदर्शक पध्दतीने व्हावे या उद्देशाने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने सर्व प्रक्रीया ऑनलाईन करण्यात आलेली आहे.

खेळाडूंनी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये मिळविलेले यश हे क्रीडा विकासाचे व वाटचालीचे प्रेरणादायी स्त्रोत आहे. सन २०१८–१९ या वर्षामध्ये आयोजित होणाऱ्या विविध क्रीडा स्पर्धांसाठी हार्दिक शुभेच्छा..!

डॉ. विजय सूर्यवंशी भा.प्र.से.
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा क्रीडा परिषद, रायगड



# मनोगत

जीवनामध्ये खेळाला अनन्य साधारण महत्व असुन संस्कृती, परंपरा, सुदृढतेचा , मुलमंत्र, आनंदी व उत्साही वातावरण निर्माण करण्यासाठी खेळातील सक्रीय सहभाग आवश्यक आहे. शालेय जीवनात विद्यार्थी खेळाडुंचा सुप्त गुणांना वाव देण्यासाठी शासनाद्वारे विविध उपक्रम, स्पर्धा आयोजित करण्यात येतात.

राज्यात क्रीडा संस्कृती जोपासण्यासाठी खेळाडु, लोकप्रतिनिधी, क्रीडा संघटना, क्रीडा संस्था, पालक व शासन पुढाकार घेत आहेत. शासनामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या विविध क्रीडा स्पर्धा बाबत सविस्तर माहिती मिळावी हा उद्देश आहे.

शासनाने क्रीडा धोरण जाहीर करुन त्याद्वारे महाराष्ट्रातील क्रीडा संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्याचा उद्देश समोर ठेवला आहे. त्याअनुषंगाने शारिरीक शिक्षण शिक्षक, खेळाडु विद्यार्थी, युवक तसेच स्वयंसेवी संस्था यांच्याकरीता विविध योजना आखुन त्याची अमंलबजावणी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाद्वारे केली जाते.

शालेय विद्यार्थ्यांचा खेळाद्वारे विकास होत असताना त्याचा परिणाम त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर होऊ नये या करीता आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय तसेच राज्य स्पर्धेमध्ये प्राविण्य व सहभाग नोंदविणाऱ्या १० व १२ वीच्या सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे वाढीव गुण देण्याच्या निर्णयाची अमंलबजावणी सन २०१५-१६ या वर्षापासुन करण्यात आली आहे. तसेच विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्त्या व शाळांना प्रोत्साहनात्मक अनुदान देऊन खेळातील सहभाग वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. तसेच युवकांसाठी राज्य युवा प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातुन चालविण्यात येणारे अभ्यासक्रम, महिला व युवतींकरीता स्वसंरक्षण प्रशिक्षण अशा नाविन्यपुर्ण योजनांद्वारे समाजातील विविध घटकांना यात सामील करुन घेण्यात आले आहे. या सर्व योजनांचा लाभ जिल्ह्यातील जास्तीत जास्त शाळा कनिष्ठ महाविद्यालये तसेच खेळाडुंनी घ्यावा.

जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड यांच्या वतीने आयोजित होणाऱ्या क्रीडा स्पर्धामध्ये रायगड जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडुंनी सहभागी व्हावे. सन २०१८-१९ या वर्षामध्ये आयोजित होणाऱ्या विविध क्रीडा स्पर्धांसाठी मनपुर्वक शुभेच्छा!!!

(महादेव कसगावडे)
जिल्हा क्रीडा अधिकारी
तथा सदस्य सचिव
जिल्हा क्रीडा परिषद रायगड

जा.क्र.जिक्रीअ/जिक्रीप/शाक्रीस्प २०१८–१९
दिनांक : ०७ जुलै २०१८

प्रति,
मा. प्राचार्य/मुख्याध्यापक
रायगड जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालये,
माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा.

**विषय** : शालेय क्रीडा स्पर्धा आयोजन सन २०१८–२०१९

महोदय / महोदया,

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागांतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा परिषद रायगड–अलिबाग मार्फत सन २०१८–१९ या शैक्षणिक वर्षात खेळांच्या विविध सतरावरील क्रीडा स्पर्धा व क्रीडा विषयक कार्यक्रमाचे प्रभावी आयोजन करणे या कार्यक्रमांतर्गत तालुका, जिल्हा व विभागस्तरावर शालेय, ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धांचे आयोजन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात येणार आहे. चालू वर्षापासून स्पर्धांचे आयोजन व तदनुषंगीक सर्व कामे ऑनलाईन पध्दतीने होणार आहेत. स्पर्धा आयोजनाच्या बाबतीतील सर्व सुचनांचा समावेश करुन सोबत जोडून पाठवित आहे. सदर सर्व सुचनांचे गांभीर्याने आवलोकन करुन स्पर्धेत आपले खेळाडू व संघ सहभागी करावेत.

सन २०१७–१८ या वर्षात आपल्या संस्था / शाळा, महाविद्यालयामार्फत सर्व शालेय, ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धा आयोजनासाठी सहकार्य प्राप्त झाल्याने त्या यशस्वीरित्या पार पाडल्या, याबद्दल आपले आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

सर्व प्राचार्य / मुख्याध्यापक यांनी वेळोवेळी क्रीडा स्पर्धांच्या आयोजनासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयास सहकार्य करावे व त्यांच्या मागणीनुसार क्रीडा शिक्षकांच्या सेवा क्रीडा विषयक बाबींसाठी उपलब्ध करुन द्याव्यात.

**मनःपूर्वक धन्यवादासह !!!**

**(महादेव कसगावडे)**
जिल्हा क्रीडा अधिकारी रायगड–अलिबाग
तथा सदस्य सचिव,
जिल्हा क्रीडा परिषद, रायगड–अलिबाग

**(भाऊसाहेब थोरात)**
शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद, रायगड–अलिबाग

**प्रत माहिसाठीसाठी सविनय सादर :-**

१) मा. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा क्रीडा परिषद, रायगड–अलिबाग.
३) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड–अलिबाग तथा सदस्य, जिल्हा क्रीडा परिषद, रायगड–अलिबाग.
४) मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, तथा सदस्य जिल्हा क्रीडा परिषद, रायगड–अलिबाग.
५) मा. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग, मुंबई.
६) मा. शिक्षणाधिकारी (प्राथ./माध्य.) तथा सदस्य जिल्हा क्रीडा परिषद, रायगड–अलिबाग.

**प्रत माहिती व योग्य कार्यवाहिस्तव.**

१) मा. गटशिक्षणाधिकारी (सर्व), रायगड जिल्हा.
२) मा. अध्यक्ष / सचिव, सर्व खेळांच्या जिल्हा संघटना, रायगड जिल्हा.

## शालेय व इतर क्रीडा स्पर्धा आयोजन पध्दत

१. महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण १९९६ नुसार शासनाने शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक राक्रीधो–१९९६/५० क्र. ३३०/क्रीयुसे–१ दिनांक १२ नोव्हेंबर १९९७ च्या परिशिष्टातील नियमावलीमध्ये अंशतः बदल करण्याचे ठरविले त्यास शासन निर्णय शुध्दिपत्रक क्रमांक राक्रीधो १०९६/५० क्र. ३३० /क्रीयुसे–१ दिनांक १४ नोव्हेंबर २००३ अन्वये सध्या अस्तित्वात असलेल्या आणि यापुढे अस्तित्वात येणाऱ्या महानगरपालिकांच्या शहरांना खेळासाठी जिल्ह्याचा दर्जा देण्यात आला आहे.

सध्या शासनाने घेतलेल्या धोरणानुसार पनवेल महानगरपालिकेची स्थापना केलेली असल्याने महानगरपालिका हद्दीतील शासनमान्य अधिकृत शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांसाठी स्वतंत्र जिल्हास्तर क्रीडा स्पर्धांचे आयोजन सन २०१७–१८ या वर्षापासून सुरु आहे.

## रायगड जिल्हा समाविष्ट तालुके

सन २०१८–१९ या वर्षापासून शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन पुढीलप्रमाणे करण्यात येणार आहे.

चालू शैक्षणिक वर्षापासून रायगड जिल्ह्यात पनवेल महानगरपालिका क्षेत्रात येणाऱ्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकडून महाविद्यालयांसाठी पनवेल महानगरपालिका जिल्हास्तर व पनवेल महानगरपालिका क्षेत्राच्या बाहेरील क्षेत्रातील शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांसाठी उर्वरीत रायगड जिल्हास्तर क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. पनवेल महानगरपालिका जिल्हा स्तरावर सर्व खेळांच्या स्पर्धा जिल्हास्तरापासून सुरु होतील. उर्वरीत रायगड जिल्हास्तर क्रीडास्पर्धेमध्ये मैदानी, कबड्डी, खो–खो, व्हॉलिबॉल, कुस्ती व बुध्दीबळ या सहा खेळांच्या स्पर्धा तालुकास्तरापासून तर याव्यतीरिक्त सर्व खेळांच्या स्पर्धा जिल्हास्तरापासून सुरु होतील.

**पनवेल महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ठ होणारी गावे :–**

तळोजे पाचनंद, काळुंद्रे, खारघर, ओवे, देवीचापाडा, कामोठे, चाल, नावडे, तोंढरे, पेंदर, कळंबोली, रोडपाली, खिडूकपाडा, पडघे, वळवली, पालेखुर्द, टेंभोडे, आसूडगाव, बीड, आडीवली, रोहींजन, धानसर, पिसार्वे, तुर्भे, करवले बद्रुक, नागझरी, तळोजे मजकूर, घोट, कोयनावेळे

तालुका स्तरावरील विजयी संघ/खेळाडू जिल्हा स्तरावर, जिल्हा स्तरावरील विजयी संघ/खेळाडू व विभागीय स्तरावर विभागीय स्पर्धेतून निवडलेले खेळाडू या सर्वाची राष्ट्रीय स्पर्धेस महाराष्ट्राचा संघ पाठविताना तो राज्यस्तर स्पर्धेतील निवड केलेले खेळाडू व विभागीय स्पर्धेतून निवडलेले खेळाडू. या सर्वांची राष्ट्रीय स्पर्धा पूर्व निवड चाचणी होऊन त्यातून राज्याचा संघ निवडला जाईल. निवडलेल्या सर्व खेळाडूंचे एकत्रित शिबीर घेऊन राज्याचा संघ राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होईल.

मुंबई विभागीय स्तरावर मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड तसेच पनवेल महानगरपालिका, कल्याण–डोंबिवली मनपा, उल्हासनगर मनपा, ठाणे मनपा, नवी मुंबई मनपा, मिराभाईंदर मनपा, भिवंडी–निजामपूर मनपा, वसई–विरार मनपा असे १३ खेळाडू/संघ सहभागी होतील. राज्य स्तरावर पुणे, कोल्हापूर, नाशिक, मुंबई, औरंगाबाद, नागपूर, अमरावती, लातूर व क्रीडा प्रबोधिनी असे एकूण ९ विभागांचे संघ/खेळाडू सहभागी होतील.

## खेळाडूंच्या वयोगटाचा तक्ता : २०१८-१९

**खेळाडूचा जन्मदिनांक व इयत्ता हे दोन्ही वयोगटानुसार सहभागी होण्यासाठीचे पात्रता निकष राहतील.**

| अ. क्र. | क्रीडा स्पर्धा | वयोगट | इयत्ता | खेळाडूंचा जन्म |
|---|---|---|---|---|
| १. | शालेय क्रीडा स्पर्धा | ११ वर्षाखालील | इ. ३री ते ५वी पर्यंत शिकत असलेले | १.१.२००८ अथवा त्यानंतरचा |
| २. | शालेय क्रीडा स्पर्धा | १४ वर्षाखालील | ६ वी ते १२ वी पर्यंत शिकत असलेले | १.१.२००५ अथवा त्यानंतरचा |
| ३. | शालेय क्रीडा स्पर्धा | १७ वर्षाखालील | ६ वी ते १२ वी पर्यंत शिकत असलेले | १.१.२००२ अथवा त्यानंतरचा |
| ४. | शालेय क्रीडा स्पर्धा | १९ वर्षाखालील | ६ वी ते १२ वी पर्यंत शिकत असलेले | १.१.२००० अथवा त्यानंतरचा |
| ५. | सुब्रतो मुखर्जी कप फुटबॉल सब ज्यूनियर | १४ वर्षाखालील मुले | कोणत्याही वर्गात शिकत असलेले | १.०१.२००५ अथवा त्यानंतरचा |
| ६. | सुब्रतो मुखर्जी कप फुटबॉल ज्यूनियर | १७ वर्षाखालील मुले व मुली | कोणत्याही वर्गात शिकत असलेले | १.०१.२००२ अथवा त्यानंतरचा |
| ७. | ज्युनियर नेहरु हॉकी स्पर्धा | १७ वर्षाखालील मुले व मुली | कोणत्याही वर्गात शिकत असलेले | १.११.२००१ अथवा त्यानंतरचा |
| ८. | सब ज्युनियर नेहरु हॉकी स्पर्धा | १५ वर्षाखालील मुले | कोणत्याही वर्गात शिकत असलेले | १.११.२००३ अथवा त्यानंतरचा |

**खेळाडूने जन्मदिनांक व इयत्ता या दोन्ही अटी पूर्ण करणे आवश्यक राहील. तथापि, निम्न वयोगटातील खेळाडू, वरीष्ठ वयोगटासाठी पात्र राहील.**

**स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पात्रता :**

शालेय क्रीडा स्पर्धेअंतर्गत खालील शाळा सहभागी होण्यास पात्र आहेत.

अ) राज्य शासनाच्या शिक्षण विभागाची मान्यता असलेल्या सर्व अधिकृत प्राथमिक/माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालये तसेच जिल्हा परिषद, नगरपरिषद, नगरपालिका यांच्याद्वारे संचलित प्राथमिक/माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये, सी.बी.एस.ई.शाळा व कनिष्ठ महाविद्यालय.

ब) राज्य शासनाने सुरु केलेल्या सैनिकी शाळा.

क) क्रीडा व युवक सेवा संचालनालयाद्वारा संचलित क्रीडा प्रबोधिनी, राज्यस्तरीय स्पर्धेसाठी स्वतंत्र विभाग म्हणून पात्र राहतील. तथापि जवाहर नवोदय विद्यालय आणि केंद्रीय विद्यालय संगठन यांना क्रीडा संचालनालयाद्वारा आयोजित क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी होता येणार नाही.

## प्रवेश अर्जाबाबतच्या सूचना

१. सन २०१८-१९ या वर्षापासून ऑनलाईन प्रवेशिका सादर करावयाची आहे.

२. www.mumbaidivsports.com या वेबसाईटवर जाऊन आपल्या शाळेचा युडायस नंबर वापरुन सर्व शाळेची माहीती बिनचूक भरावी.

३. शाळेची माहीत भरल्यानंतर आपल्या खेळाची प्रवेशिक ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे.

४. मैदानी स्पर्धा व जलतरण स्पर्धांचे प्रवेश अर्ज भरताना इव्हेंटची नावे नमूद करावीत.

५. प्रवेश अर्ज जबाबदार क्रीडा शिक्षकाने पुढील पानावर नमुद केल्यानुसार संबंधित ठिकाणी सादर करावेत. प्रवेश अर्ज ऑनलाईन सादर केल्यानंतार तालुकास्तर, जिल्हास्तर स्पर्धेचे वेळापत्रक घेऊन जाण्याची जबाबदारी आपली राहील.

६. प्रवेश अर्ज विहीत मुदतीतच सादर करावेत. मुदतीनंतर आलेले, प्रवेश फी व क्रीडा निधी भरणा न केलेले व अपूर्ण प्रवेश अर्ज ऑनलाईन स्वीकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

## क्रीडा निधी व प्रवेश शुल्क

| विद्यार्थी संख्या | क्रीडा निधी | विद्यार्थी संख्या | क्रीडा निधी |
|---|---|---|---|
| ५०० पेक्षा कमी | ३५०/- | ५०० पेक्षा जास्त | ५००/- |

## प्रवेश शुल्क

| अ.क्र. | तपशील | | प्रवेश शुल्क |
|---|---|---|---|
| १. | सांघिक खेळ (१४,१७,१९ वर्षे मुले, मुली प्रती संघ)<br>**(खालील अनुक्रमांक ३ ते १७ वगळून)** | | रु. ५०/- (प्रतिसंघ) |
| २. | वैयक्तिक खेळ | | रु. २५/- (प्रतिबाब/प्रतिखेळाडू) |
| ३.<br>४.<br>५.<br>६.<br>७.<br>८.<br>९.<br>१०. | बॅडमिंटन<br>लॉन टेनिस<br>टेबल टेनिस<br>नेहरु हॉकी<br>सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल<br>शालेय क्रिकेट<br>शालेय फुटबॉल<br>टेनिसबॉल क्रिकेट | ११. वॉटरपोलो<br>१२. रोलबॉल<br>१३. बेसबॉल<br>१४. सॉफ्टबॉल<br>१५. बॉल बॅडमिंटन<br>१६. मॉन्टेक्स बॉल क्रीकेट(रबरी)<br>१७. रग्बी | रु. १००/-<br>(प्रतिसंघ प्रति वयोगट) |
| १८.<br>१९.<br>२०. | बुद्धीबळ<br>कॅरम<br>रायफल शुटींग | | प्रति वयोगट ५०/-<br>प्रति वयोगट ५०/-<br>प्रति खेळाडू १००/- |

## क्रीडानिधी व प्रवेश फी स्वीकृती

### सन : २०१८-१९ क्रीडा स्पर्धा प्रवेश अर्ज स्विकृती कार्यक्रम

**ऑनलाईन प्राथमिक प्रवेशिका सादर केल्यानंतर ऑनलाईन पेमेंट गेटवे व्दारे प्रवेश फी व क्रीडा निधी भरणा करावा. रोख रुपात स्विकारली जाणार नाही. ऑनलाईन प्रवेशिका तसेच प्रवेश फी, क्रीडा निधी आदा करण्याचा अंतिम कालावधी दि. ३१/०७/२०१८ राहील. त्यांनतर कोणत्याही प्रवेशिका स्विकारल्या जाणार नाहीत.**

## मैदानी स्पर्धेतील स्पर्धा बाबींचा तक्ता

| वयोगट | खेळाच्या बाबी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | धावणे (मी.) | हर्डल्स | रिले | उडी | फेकी | चालणे | क्रॉसकंट्री |
| १४<br>मुले व मुली | १००, २००<br>४००, ६००. | ८० मी.<br>उंची ०.७६ सें.मी | ४ X १०० | उंच उडी<br>लांब उडी | गोळा फेक (४ कि. ग्रॅ.)<br>थाळी फेक (१ कि. ग्रॅ.) | --- | --- |
| १७ मुले | १००, २००<br>४००, ८००<br>१५००,३०००. | १०० मी.<br>उंची ०.९९ सें.मी | ४ X १०० | उंच उडी<br>लांब उडी<br>बांबू उडी<br>तिहेरी उडी | गोळा फेक (५ कि. ग्रॅ.)<br>थाळी फेक (१.५ कि. ग्रॅ.)<br>भाला फेक (७०० ग्रॅ.)<br>हातोडा फेक (५ कि. ग्रॅ.) | ५ कि.मी. | --- |
| १७ मुली | १००, २००<br>४००, ८००<br>१५००,३०००. | १०० मी.<br>उंची ०.८४ सें.मी | ४ X १०० | उंच उडी<br>लांब उडी<br>बांबू उडी<br>तिहेरी उडी | गोळा फेक (४ कि. ग्रॅ.)<br>थाळी फेक (१ कि. ग्रॅ.)<br>भाला फेक (६०० ग्रॅ.)<br>हातोडा फेक (४ कि. ग्रॅ.) | ३ कि.मी. | --- |
| १९ मुले | १००, २००<br>४००, ८००<br>१५००,५०००. | ११० मी.<br>उंची १.०६७ सें.मी<br>४०० मी.<br>उंची ०.९४ सें.मी | ४ X १००<br>४ X ४०० | उंच उडी<br>लांब उडी<br>बांबू उडी<br>तिहेरी उडी | गोळा फेक (७.२६ कि. ग्रॅ.)<br>थाळी फेक (२ कि. ग्रॅ.)<br>भाला फेक (८०० ग्रॅ.)<br>हातोडा फेक (७.२६ कि. ग्रॅ.) | ५ कि.मी. | ५ कि.मी. |
| १९ मुली | १००, २००<br>४००, ८००<br>१५००,३०००<br>५०००. | १०० मी.<br>उंची ०.८६ सें.मी<br>४०० मी.<br>उंची ०.७६ सें.मी | ४ X १००<br>४ X ४०० | उंच उडी<br>लांब उडी<br>बांबू उडी<br>तिहेरी उडी | गोळा फेक (४ कि. ग्रॅ.)<br>थाळी फेक (१ कि. ग्रॅ.)<br>भाला फेक (६०० ग्रॅ.)<br>हातोडा फेक (४ कि. ग्रॅ.) | ५ कि.मी. | ३ कि.मी. |

## जलतरण स्पर्धेतील स्पर्धा बाबींचा तक्ता

| | बाब / वयोगट | १४ वर्षे मुले १४ वर्षे मुली | १७ वर्षे मुले | १७ वर्षे मुली | १९ वर्षे मुले | १९ वर्षे मुली |
|---|---|---|---|---|---|---|
| * | फ्रिस्टाईल : | ५०, १००, २००, ४०० मी. | ५० , १००<br>२००, ४००<br>८०० मी. | ५० , १००<br>२००, ४०० मी. | ५० , १००<br>२००, ४००<br>१५०० मी. | ५० , १००<br>२००, ४००<br>८०० मी. |
| * | बॅक स्ट्रोक | ५०, १००, २०० मी. | ५०, १००, २०० मी. | | ५०, १००, २०० मी. | |
| * | बॅक स्ट्रोक | ५०, १००, २०० मी. | ५०, १००, २०० मी. | | ५०, १००, २०० मी. | |
| * | बटर फ्लाय | ५०, १००, २०० मी. | ५०, १००, २०० मी. | | ५०, १००, २०० मी. | |
| * | वैयक्तिक मिडले | २०० मी. | २००, ४०० मी. | | २००, ४०० मी. | |
| * | रिले : | ४ X१०० मी. फ्रीस्टाईल रिल | ४ X१०० मी. फ्रीस्टाईल रिल | | ४ X१०० मी. फ्रीस्टाईल रिल | |
| | | ४ X१०० मी. मिडले रिले | ४ X१०० मी. मिडले रिले | | ४ X१०० मी. मिडले रिले | |
| * | डायव्हिंग | १, ३ मी. स्प्रिंगबोर्ड<br>हायबोर्ड डायव्हिंग | १, ३ मी. स्प्रिंगबोर्ड<br>हायबोर्ड डायव्हिंग | | १, ३ मी. स्प्रिंगबोर्ड<br>हायबोर्ड डायव्हिंग | |

## ❋ सिकई मार्शल आर्ट

| | |
|---|---|
| १४ वर्षे | **मुले –** २५ किलो खालील, २९कि.खा., ३३कि.खा., ३७ कि.खा., ४१ कि.खा., ४५ कि.खा., ४५ कि. वरील |
| | **मुली –** २३ किलोखालील, २७ कि.खा., ३१ कि.खा., ३५ कि.खा., ३९ कि.खा, ४१ कि.खा., ४१ कि. वरील |
| १७ वर्षे | **मुले –** ४० किलो खालील, ४४ कि.खा., ४८ कि.खा., ५२कि.खा., ५६ कि.खा., ६०कि.खा., ६० कि. वरील |
| | **मुली –** ३६ किलोखालील, ४० कि.खा., ४४ कि.खा., ४८ कि.खा., ५२ कि.खा., ५६ कि.खा., ५६ कि. वरील |
| १९ वर्षे | **मुले –** ४६ किलो खालील, ५० कि.खा., ५४ कि.खा., ५८ कि.खा., ६२ कि.खा., ६६कि.खा. ६६ कि. वरील |
| | **मुली –** ४२ किलोखालील, ४६ कि.खा., ५० कि.खा., ५४ कि.खा., ५८ कि.खा., ६२ कि.खा., ६२ कि. वरील |

## ❋ बॉक्सिंग

| | |
|---|---|
| १४ वर्षे | **मुले –** २८ ते ३०, ३० ते ३२, ३२ ते ३४, ३४ ते ३६, ३६ ते ३८, ३८ ते ४०, ४० ते ४२, ४२ ते ४४, ४४ ते ४६, ४६ ते ४८, ४८ ते ५०. |
| १७ वर्षे | **मुले –** ४६ किलोखालील, ४६ ते ४८, ४८ ते ५०, ५० ते ५२, ५२ ते ५४, ५४ ते ५७, ५७ ते ६०, ६० ते ६३, ६३ ते ६६ ते ७०, ७० ते ७५, ७५ ते ८०, ८० किलो वरील. |
| | **मुली –** ४२ किलोखालील, ४२ ते ४४, ४४ ते ४६, ४६ ते ४८, ४८ ते ५०, ५० ते ५२, ५२ ते ५४, ५४ ते ५७, ५७ ते ६०, ६० ते ६३, ६३ ते ६६, ६६ ते ७०, ७० ते ७५, ७५ ते ८०, ८० किलो वरील. |
| १९ वर्षे | **मुले –** ४६ किलोखालील, ४६ ते ४९, ४९ ते ५२, ५२ ते ५६, ५६ ते ६०, ६० ते ६४, ६४ ते ६९, ६९ ते ७५, ७५ ते ८१, ८१ ते ९१, ९१ वरील. |
| | **मुली–** ४५ किलोखालील, ४५ ते ४८, ४८ ते ५१, ५१ ते ५४, ५४ ते ५७, ५७ ते ६०, ६० ते ६४, ६४ ते ६६, ६६ ते ६९,६९ ते ७५, ७५ ते ८१, ८१ किलो वरील. |

## ❋ कराटे

| | |
|---|---|
| १४ वर्षे | **मुले –** २० किलो खालील, २५ कि.खा., ३० कि.खा., ३५ कि.खा., ४० कि.खा., ४५ कि.खा., ५० कि.खा., ५५ कि.खा., ६० कि.खा. ६० कि.वरील<br>**मुली –** १८ किलो खालील, २२ कि.खा., २४ कि.खा., २६ कि.खा., ३० कि.खा., ३४ कि.खा., ३८ कि.खा., ४२ कि.खा., ४६ कि.खा. ५० कि.खा, ५० कि.वरील. |
| १७ वर्षे | **मुले –** ३५ किलोखालील, ४० कि.खा., ४५ कि.खा., ५० कि.खा., ५४ कि.खा., ५८ कि.खा. ६२ कि.खा., ६६ कि.खा., ७० कि.खा. ७४ कि.खा, ७८ कि.खा, ८२ कि.खा, ८२ कि. वरील<br>**मुली –** ३२ कि.खा., ३६ कि.खा., ४० कि.खा., ४४ कि.खा., ४८कि.खा., ५२ कि.खा., ५६ किलो, ६० कि.खा., ६४ कि.खा., ६८ कि.खा.,६८किलोवरील, |
| १९ वर्षे | **मुले –** ३५ किलोखालील, ४० कि.खा., ४५ कि.खा., ५० कि.खा., ५४ कि.खा., ५८ कि.खा. ६२ कि.खा., ६६ कि.खा., ७० कि.खा. ७४ कि.खा, ७८ कि.खा, ८२ कि.खा, ८२ कि. वरील<br>**मुली –** ३२ कि.खा., ३६ कि.खा., ४० कि.खा., ४४ कि.खा., ४८कि.खा., ५२ कि.खा., ५६ किलो, ६० कि.खा., ६४ कि.खा., ६८ कि.खा.,६८किलोवरील, |

## ❋ जम्परोप

| | |
|---|---|
| १४, १७, १९ वर्ष मुले/मुली | १) इन्डुरन्स –३ मी. २) स्पीड–३० सेकंद ३) डबल अंडर ४) फ्री स्टाईल ५) डबल अंडर रिले (सांघिक) ६) स्पीड रिले ३० सेकंद (सांघिक) |

## ❋ रोपस्किपिंग

| | |
|---|---|
| १४, १७, १९ वर्ष मुले/मुली | १) इन्डुरन्स –३ मी. २) स्पीड–३० सेकंद ३) डबल अंडर ३० सेकंद ४) फ्री स्टाईल ५) डबल अंडर रिले ३० सेकंद (सांघिक) ६) स्पीड रिले ३० सेकंद (सांघिक) ७) टीम फ्रिस्टाईल ८) स्पीड ९) डबल डच फ्रीस्टाईल |

## ❊ पॉवरलिफ्टींग

| | |
|---|---|
| १९ वर्ष मुले/मुली | **मुले –** ५३ कि. ५९ कि. ६६ कि. ७४ कि. ८३ कि. ९३ कि. १०५ कि.१२० कि. १२० किलोवरील |
| | **मुली –** ४३ कि. ४७ कि. ५२ कि. ५७ कि. ६३ कि. ७२ कि. ८४ कि. ८४ किलोवरील. |

## ❊ कुस्ती

| | |
|---|---|
| १४ वर्षे मुले फ्रीस्टाईल | ३२ कि. खालील, ३५ कि.खा., ३८ कि.खा. ४१ कि.खा., ४५ कि.खा., ४९ कि.खा., ५५ कि.खा., ६० कि.खा. |
| १४ वर्षे मुली फ्रीस्टाईल | ३० कि. खालील, ३२ कि.खा., ३५ कि.खा. ३८ कि.खा., ४१ कि.खा., ४४ कि.खा., ४८ कि.खा., ५२ कि.खा. |
| १७ वर्षे मुले फ्रीस्टाईल व ग्रिकोरोमन | ४२ कि. खालील, ४६ कि.खा., ५० कि.खा. ५४ कि.खा., ५८ कि.खा., ६३ कि.खा., ६९ कि.खा., ७६ कि.खा., ८५ कि.खा., १००कि.खा. |
| १७ वर्षे मुली फ्रीस्टाईल | ३८ कि. खालील, ४० कि.खा., ४३ कि.खा. ४६ कि.खा., ४९ कि.खा., ५२ कि.खा., ५६ कि.खा., ६० कि.खा., ६५ कि.खा., ७०कि.खा. |
| १९ वर्षे मुले फ्रीस्टाईल व ग्रिकोरोमन | ४२ कि. खालील, ४६ कि.खा., ५० कि.खा. ५५ कि.खा., ६० कि.खा., ६६ कि.खा., ७४ कि.खा., ८४ कि.खा., ९६ कि.खा., १२०कि.खा. |
| १९ वर्षे मुली फ्रीस्टाईल | ४४ कि. खालील, ४८ कि.खा., ५१ कि.खा. ५५ कि.खा., ५९ कि.खा., ६३ कि.खा., ६७ कि.खा., ७२ कि.खा. |

## ❊ वेटलिफ्टींग

| | |
|---|---|
| १७ वर्षाखालील | मुले – ५० कि. खालील, ५६ कि.खा., ६२ कि.खा. ६९ कि.खा., ७७ कि.खा., ८५ कि.खा., ९४ कि.खा., ९४ कि.वरील |
| | मुली – ४४ कि. खालील, ४८ कि.खा., ५३ कि.खा. ५८ कि.खा., ६३ कि.खा., ६९ कि.खा., ७५ कि.खा., ७५ कि.वरील. |
| १९ वर्षाखालील | मुले – ५० कि. खालील, ५२ कि.खा., ६९ कि.खा. ७७ कि.खा., ८५ कि.खा., ९४ कि.खा., १०५ कि.खा., १०५ कि. वरील |
| | मुली – ४४ कि. खालील, ४८ कि.खा., ५३ कि.खा. ५८ कि.खा., ६३ कि.खा., ६९ कि.खा., ७५ कि.खा., ७५ कि.वरील. |

## ❊ तायक्वाँदो

| | |
|---|---|
| १४ वर्षाखालील | मुले – १८ कि.खालील, १८ ते २१ कि., २१ ते २३ कि., २३ ते २५ कि, २५ ते २७ कि., २७ ते २९ कि., २९ ते ३२ कि. ३२ ते ३५ कि., ३५ ते ३८ कि. ३८ ते ४१ कि, ४१ ते ४६ कि. |
| | मुली– १६ कि.खालील, १६ ते १८ कि., १८ ते २० कि., २० ते २२ कि, २२ ते २४ कि., २४ ते २६ कि., २६ ते २९ कि. २९ ते ३२ कि., ३२ ते ३५ कि. ३५ ते ३८ कि, ३८ ते ४१ कि. |
| १७ वर्षाखालील | मुले – ३५ कि.खालील, ३५ ते ३८ कि., ३८ ते ४१ कि., ४१ ते ४५ कि, ४५ ते ४८ कि., ४८ ते ५१ कि., ५१ ते ५५ कि. ५५ ते ५९ कि., ५९ ते ६३ कि.६३ ते ६८, ६८ ते ७३, ७३ ते ७८, ७८ कि. वरील |
| | मुली –३२ कि.खालील, ३२ ते ३५ कि., ३५ ते ३८ कि., ३८ ते ४२ कि, ४२ ते ४४ कि., ४४ ते ४६ कि., ४६ ते ४९ कि. ४९ ते ५२ कि., ५२ ते ५५, ५५ ते ५९ कि. ५९ ते ६३, ६३ ते ६८, ६८ कि.वरील |
| १९ वर्षाखालील | मुले – ४५ कि.खालील, ४५ ते ४८ कि., ४८ ते ५१ कि., ५१ ते ५५ कि, ५५ ते ५९ कि., ५९ ते ६३ कि., ६३ ते ६८ कि.६८ते ७३, ७३ ते ७८कि. वरील |
| | मुली –४० कि.खालील, ४० ते ४२ कि., ४२ ते ४४ कि., ४४ ते ४६ कि, ४६ ते ४९ कि., ४९ ते ५२ कि., ५२ ते ५५ कि. ५५ ते ५९, ५९ ते ६३, ६३ ते ६८, ६८ कि. वरील |

## ❊ ज्युदो

| | |
|---|---|
| १४ वर्षाखालील | मुले – २५ कि.खालील, ३० कि.खा., ३५ कि.खा., ४० कि.खा., ४५ कि.खा., ५० कि.खा., ५० कि. वरील |
| | मुली – २३ कि.खालील, २७ कि.खा., ३२ कि.खा., ३६ कि.खा., ४० कि.खा., ४४ कि.खा., ४४ कि. वरील |
| १७ वर्षाखालील | मुले – ४० कि.खालील, ४५ कि.खा., ५० कि.खा., ५५ कि.खा., ६० कि.खा., ६६ कि.खा., ७३ कि.खा. ८१ कि.खा, ९० कि.खा. ९० कि. वरील |
| | मुली – ३६ कि.खालील, ४० कि.खा., ४४ कि.खा., ४८ कि.खा., ५२ कि.खा., ५७ कि.खा., ६३ कि.खा. ७० कि.खा., ७०कि. वरील |
| १९ वर्षाखालील | मुले – ४० कि.खालील, ४५ कि.खा., ५० कि.खा., ५५ कि.खा., ६० कि.खा., ६६ कि.खा., ७३ कि.खा. ८१ कि.खा, ९० कि.खा. ९० कि. वरील |
| | मुली – ३६ कि.खालील, ४० कि.खा., ४४ कि.खा., ४८ कि.खा., ५२ कि.खा., ५७ कि.खा., ६३ कि.खा. ७० कि.खा., ७०कि. वरील |

## ※ वुशू

| | |
|---|---|
| १७ वर्षाखालील | मुले - ४० कि. खालील, ४० ते ४५ कि., ४५ ते ४८ कि, ४८ ते ५२ कि., ५२ ते ५६ कि.,५६ ते ६०कि., ६० ते ६५ कि., ६५ ते ७०कि., ७० ते ७५कि., ७५ ते ८०कि. ८० ते ८५ |
| | मुली - ३६ कि. खालील, ३६ ते ४० कि., ४० ते ४५ कि, ४५ ते ४८कि, ४८ ते ५२ कि, ५२ ते ५६ कि, ५६ ते ६० कि, ६० ते ६५ कि, ६५ ते ७० कि |
| १९ वर्षाखालील | मुले - ४० कि. खालील, ४० ते ४५ कि., ४५ ते ४८ कि, ४८ ते ५२ कि., ५२ ते ५६ कि.,५६ ते ६०कि., ६० ते ६५ कि., ६५ ते ७०कि., ७० ते ७५कि., ७५ ते ८०कि. ८० ते ८५ |
| | मुली - ३६ कि. खालील, ३६ ते ४० कि., ४० ते ४५ कि, ४५ ते ४८कि, ४८ ते ५२ कि, ५२ ते ५६ कि, ५६ ते ६० कि, ६० ते ६५ कि, ६५ ते ७० कि |

## ※ धनुर्विद्या

| | इंडियन राऊंड | फिटा राऊंड |
|---|---|---|
| १४ वर्षाखालील मुले व मुली | २० व ३० मीटर | ३०, ४० व ५० मीटर |
| १७ वर्षाखालील मुले व मुली | ३० व ४० मीटर | ३०, ५०, ६० व ७० मीटर |
| १९ वर्षाखालील मुले व मुली | ३० व ५० मीटर | ३०, ५०, ६० व ७० मीटर |

## ※ सायकलिंग

| | मास स्टार्ट अंतर | स्प्रिंट | लॅप्स | टाईम ट्रायल |
|---|---|---|---|---|
| १४ वर्षा खालील मुले | १०-१२ कि.मी. | २०० | १० | ४-६ कि.मी. |
| १४ वर्षा खालील मुली | ७-१० कि.मी. | २०० | १० | ४-६ कि.मी. |
| १७ वर्षा खालील मुले | १५-१७ कि.मी. | २०० | १२ | ५-७ कि.मी. |
| १७ वर्षा खालील मुली | १०-१२ कि.मी. | २०० | १८ | ५-७ कि.मी. |
| १९ वर्षा खालील मुले | २०-२५ कि.मी. | २०० | १८ | १५-१९ कि.मी. |
| १९ वर्षा खालील मुली | १५-१७ कि.मी. | २०० | १८ | १०-१२ कि.मी. |

## ※ कबड्डी

| वयोगट | वजनगट | |
|---|---|---|
| | मुले (कि. ग्रॅ.) | मुली (कि. ग्रॅ.) |
| १४ वर्षे | ५१ | ४८ |
| १७ वर्षे | ५७ | ५३ |
| १९ वर्षे | ६५ | ५९ |

# शालेय निवड चाचणी

निवड चाचणीचे निकष हे गतवर्षाप्रमाणेच राहतील. जिल्हास्तरावर हरलेल्या संघातून उत्कृष्ट खेळाडूंची निवड जिल्हा समितीद्वारे करण्यात येईल व निवड केलेले खेळाडू विभागीय निवड चाचणीसाठी पाठवण्यात येतील. तेथील विभागीय निवड समिती उत्कृष्ट निवड राज्यस्तरीय निवड चाचणीसाठी करतील.

खेळ निहाय जिल्हा व विभागीय स्पर्धासाठी खालील सदस्यांपैकी तीन सदस्यांची जिल्हास्तरीय निवड समिती जिल्हा क्रीडा अधिकारी गठीत करतील तर विभागस्तरीय निवड समिती विभागीय क्रीडा उपसंचालक गठीत करतील.

जिल्हा क्रीडा अधिकारी हे जिल्हास्तरीय निवड समितीचे पदसिद्ध अध्यक्ष राहतील, तर विभागीय निवड समितीचे पदसिद्ध अध्यक्ष विभागीय उपसंचालक अथवा त्यांचे प्रतिनिधी राहतील.

१) संबंधित खेळांचे अर्जुन किंवा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते खेळाडू किंवा द्रोणाचार्य किंवा उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कारार्थी.
२) संबंधित खेळाच्या जिल्हा/राज्य संघटनेचे तज्ञ व अनुभवी प्रतिनिधी.
३) संबंधित खेळांचे जिल्ह्यात कार्यरत असणारे मार्गदर्शक. (राज्य/साई)
४) जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील क्रीडा अधिकारी.
५) माध्यमिक शाळेतील तज्ञ क्रीडा शिक्षक.

**जिल्हास्तरीय निवड चाचणी :-**

जिल्हास्तरीय निवड समिती सदस्य जिल्हास्तरीय सामने सुरु असताना बॅडमिंटन, लॉन टेनिस, टेबल टेनिस या खेळातील हरलेल्या संघातून प्रत्येकी तीन व इतर सांघिक खेळातील पाच सर्वोत्कृष्ट खेळाडूंची निवड करतील. जिल्हास्तरीय स्पर्धेतून निवड झालेल्या खेळाडूंना विभागीय निवड चाचणीसाठी पाठविण्यात येईल. यामध्ये निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

**विभागीय निवड चाचणी :-**

विभागीय क्रीडा स्पर्धेत हरलेल्या संघातील तसेच जिल्ह्यातून निवड चाचणीसाठी आलेल्या खेळाडूंचे चाचणी सामने घेऊन बॅडमिंटन, लॉनटेनिस, टेबलटेनिस खेळातील प्रत्येकी तीन व इतर सांघिक खेळातील पाच सर्वोत्कृष्ट खेळाडूंची निवड करुन निवड झालेल्या खेळाडूंना विभागीय क्रीडा उपसंचालकांच्या शिफारशीने राज्यस्तरीय निवड चाचणीसाठी पाठविण्यात येईल. यामध्ये निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

**राज्यस्तरीय निवड चाचणी :-**

राज्याच्या संघाची निवड करण्याकरीता क्रीडा संचालनालयामार्फत खेळनिहाय तीन सदस्यांची निवड समिती गठीत करण्यात येते. राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील तसेच विभागातून निवड झालेल्या खेळाडूंची राज्यस्तरावर निवड चाचणी आयोजित करण्यात येऊन, महाराष्ट्राचा संघ निवडला जातो.

## शालेय क्रीडा स्पर्धेचे नियम

- शालेय क्रीडा स्पर्धेचे भारतीय शालेय खेळ महासंघाने पुरस्कृत केलेले नियम अवलंबविण्यात येतील. शालेय क्रीडा स्पर्धेत एका खेळाडूस एका खेळात एकाच वयोगटात भाग घेता येईल, अन्य खेळात सहभागी व्हावयाचे असेल तर सहभागी होता येईल.

  उदा. : फुटबॉल या खेळात १४ वर्षाआतील खेळाडूला १७ वर्षाआतील किंवा १९ वर्षाआतील वयोगटात सहभागी होता येईल. परंतु एखादा १७/१९ वर्षे गटात सहभागी झाल्यावर त्याच खेळात १४ वर्षाच्या गटात खेळता येणार नाही. १४ वर्षाआतील किंवा सहभाग न घेतलेल्या दुसऱ्या वयोगटात सहभागी होता येईल. परंतु फुटबॉलऐवजी दुसऱ्या खेळात तो वयोगट बदलू शकतो.
- मैदानी स्पर्धा व जलतरण स्पर्धा :-

  अ) एका शाळेच्या/महाविद्यालयाच्या फक्त दोन खेळाडूंना ॲथलेटिक्स व जलतरण मधील एका बाबीमध्ये (रिले वगळता) भाग घेता येईल.

  ब) एका खेळाडूस कोणत्याही तीनच बाबीमध्ये व रिलेच्या दोन्ही बाबींमध्ये सहभागी होता येईल.
- क्रॉसकन्ट्री :-

  क्रॉसकन्ट्री धावण्याच्या स्पर्धा फक्त १९ वर्षाआतील मुलामुलींसाठी असून क्रॉसकन्ट्री धावण्याचे अंतर मुलांसाठी ५३२२ मीटर व मुलींसाठी ३४३५ मीटर राहील. क्रॉसकन्ट्रीला संघ ६ खेळाडूंचा असून त्यापैकी ४ खेळाडू प्रत्यक्ष शर्यतीत भाग घेतील व २ खेळाडू राखीव असतील. सांघिक विजेते पदासाठी संघातील ३ खेळाडू अंतिम रेषेपर्यंत स्पर्धा पूर्ण करतील व गुणानुक्रमे १० मध्ये असतील अशा संघाना वेळेप्रमाणे क्रमवारी देण्यात येईल.

- बॅडमिंटन या खेळांच्या स्पर्धा सांघिक स्वरुपात आयोजित करण्यात येतील. पहिला सामना सिंगल, दुसरा डबल्स व तिसरा सामना सिंगल्स आयोजित करुन स्पर्धेचा निकाल ठरविण्यात येईल. बॅडमिंटन खेळासाठी किमान तीन व कमाल पाच खेळाडूंचा संघ सहभागी करणे आवश्यक राहील.
- शुटिंग या खेळाच्या स्पर्धा १० मी. एअर रायफल, एअर पिस्टल व ओपन एअर रायफल या तीन प्रकारात आयोजित करण्यात येतील, तथापि एका खेळाडूस एकाच प्रकारात सहभाग घेता येईल.
- जिम्नॅस्टिक्स या खेळामध्ये १४, १७ व १९ वर्षाखालील मुलांना फ्लोअर एक्सरसाईज, व्हॉल्टींग टेबल, पॅरलल बार, पोमेल हॉर्स, रोमन रिंग व हॉरिझंटल बार तसेच १४, १७ व १९ वर्षाखालील मुलींना फ्लोअर एक्सरसाईज, व्हॉल्टींग टेबल, अनइव्हन बार, बॅलन्सींग बीम या साहित्यावर एच्छिक / अनिवार्य संच करावे लागतील.

  रिदमीक जिम्नॅस्टिक्स मध्ये मुलींना बॉल, रिबन, रोप व रिंग या साहित्यासह एच्छिक संच करावे लागतील.

  अक्रोबॅटिक्स मध्ये मेन्स पेअर, वुमेन्स पेअर, ट्रायो वुमेन्स, मेन्स टीम (४ मुले), मिक्स पेअर एच्छिक संच करावे लागतील.
- नेहरु हॉकी स्पर्धेत एका खेळाडूस ज्यु. अथवा सब ज्युनिअर यापैकी कोणत्याही एकाच वयोगटात सहभागी होता येईल.
- सुब्रतो मुखर्जी कप फुटबॉल स्पर्धेत एका खेळाडूस १४ किंवा १७ यापैकी एकचा वयोगटात सहभागी होता येईल.
- राज्यस्तर नेहरु हॉकी स्पर्धा व राज्यस्तर सुब्रतो मुखर्जी कप फुटबॉल स्पर्धेतील विजयी संघ राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग होईल. (निवड चाचणी होणार नाही.)
- सर्व स्तरावरील स्पर्धा दररोज सकाळी ९.३० वाजता सुरु होतील.
- शासनाच्या वतिने आयोजित विविध खेळांच्या स्पर्धेमध्ये अल्पसंख्यांक मुलामुलींना प्राध्यान्याने सहभागी करण्याबाबत आपल्या स्तरावरुन प्राधान्याने कार्यवाही करावी.

क्रीडा स्पर्धेचा कार्यक्रम सोबत दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे पार पाडण्याचा कटाक्षाने प्रयत्न करण्यात येईल, तथापि काही अपरिहार्य कारणास्तव स्पर्धेच्या वेळापत्रकात बदल करणे भाग पडल्यास स्थानिक वृत्तपत्रामधून सदरचा बदल प्रसिध्द करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल. संबंधितांनी कृपया ही बाब लक्षात घेवून बदलाप्रमणे आपले खेळाडू / संघ स्पर्धेत वेळेत सहभागी करावेत तसेच या संबंधाने आपल्या क्रीडा शिक्षकांस वारंवार या कार्यालयाच्या संपर्कात राहण्याबाबत आदेशीत करावे.

# शालेय क्रीडा स्पर्धा आयोजनासंबंधी संहिता नियमावली

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व यवुक सेवा संचालनालयाच्या निर्मितीपासून शालेय व इतर क्रीडा स्पर्धा आयोजन करण्यात येत आहे.

भारतीय शालेय खेळ महासंघाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार शालेय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येते.

शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्यावतीने आयोजित क्रीडा स्पर्धांचे आयोजन शिस्तबध्द, काटेकोरपणे होणे आवश्यक आहे. तसेच विविध स्पर्धांमधून योग्य खेळाडूंची निवड झाल्यास राज्याचा उत्तम संघ राष्ट्रीय स्पर्धेसाठी सहभागी होवून राज्याचे नाव लौकिकात भर पडेल.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करुन स्पर्धेचे काटेकोरपणे पालन, योग्य खेळाडूची निवड, स्पर्धा आयोजनामध्ये खेळाडू संयोजन, मार्गदर्शन यांनी पाळावयाची शिस्त याबाबत एकसंहिता मा. आयुक्त क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून क्रीडा सपर्धांसहिता सन २००८–२००९ च्या स्पर्धेपासून अंमलबजावणी करण्यात येत आहे. ती पुढीलप्रमाणे.

**नियम :-**

१) भारतीय शालेय खेळ महासंघाव्दारे आयोजित करण्यात येणाऱ्या विविध शालेय क्रीडा स्पर्धा आयोजनाचे इतर तालुका, जिल्हा विभाग, राज्य, राष्ट्रीयस्तर असे राहतील.

२) भारतीय शालेय महासंघाच्यावतीने घेण्यात येणाऱ्या शालेय क्रीडा स्पर्धांसाठी भारतीय खेळ प्राधिकरणाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या क्रीडा स्पर्धांसाठी राज्याचा संघ पाठविणे अथवा न पाठविणे या बाबतचे सर्वस्वी अधिकार मा.आयुक्त क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहतील.

३) भारतीय शालेय महासंघाने, त्या–त्या खेळाच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्याची जबाबदारी ज्या राज्याकडे सोपविली असेल व त्या खेळाच्या स्पर्धेचे आयोजन, कोणत्याही कारणास्तव त्या राज्याकडून होऊ शकले नाही व त्यामुळे त्या खेळाच्या राष्ट्रीय स्पर्धेपासून व पर्यायाने त्या खेळाच्या सहभागाच्या प्रमाणपत्रापासून खेळाडूस वंचित रहावे लागल्यास त्यास क्रीडा व युवक सेवा संचालनालय अथवा त्यांचे अधिनस्त कार्यालय जबाबदार राहणार नाही.

४) शालेय व इतर क्रीडा स्पर्धांचे प्रत्येक स्तरावरील आयोजन हे (Knock-out) बाद पध्दतीत करण्यात येईल.

५) भारतीय शालेय खेळ महासंघाच्या निर्देशानुसार कनिष्ठ गटातील खेळाडूला वरिष्ठ गटात सहभाग घेता येईल. तथापि शैक्षणिक वर्षात कोणत्याही विशिष्ट खेळात, एकाच वयोगटात खेळणे बंधनकारकर आहे.
उदा. एक खेळाडू जर खो–खो खेळण्यासाठी १४ वर्षाखालील वयोगटामध्ये सहभागी होत असेल तर त्याच वर्षी त्याला खो–खो खेळण्यासाठी पुनश्च १७ किंवा १९ वर्षाखालील वयोगटामध्ये सहभागी होता येणार नाही. तथापि त्याच वर्षी खो–खो शिवाय इतर अन्य खेळात त्याला १४,१७,१९ वर्षाखालील कोणत्याही वयोगटात पात्र असल्यास सहभागी होता येईल.

६. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला ज्या शाळेमधून त्यांची नोंद झाली असेल व कोणत्याही स्पेर्धत त्या शाळेमधून

सहभागी झाला असेल त्याच संस्थेकडून ज्याच शैक्षणिक वर्षामध्ये खेळात येईल.

७. एका संस्थेस प्रत्येक सांघिक खेळ प्रकारामध्ये प्रत्येक वयोगटात एका संघात प्रवेश घेता येईल व वैयक्तिक क्रीडा प्रकारामध्ये प्रत्येक बाबीमध्ये जास्तीतजास्त २ स्पर्धकांना सहभागी होता होईल.

८. एका खेळाडूस वैयक्तिक क्रीडा प्रकारामध्ये जास्तीत जास्त ३ बाबीमध्ये सांघिक (रिले, क्रॉसकंट्री) मध्ये सहभागी होता येईल.

९. प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये मान्यताप्राप्त प्राथमिक, माध्यमिक शाळांनी व कनिष्ठ महाविद्यालयानी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचेकडील परिपत्रक क्र. राक्रीधो–२०५/प्र. क्र./१५/क्रीयुसे–१, दिनांक २ एप्रिल २००५ अन्वये शाळेमील प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एका खेळाच्या शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये भाग घ्यावा, असे सूचित केले आहे. त्यानुसार प्रत्येक शाळेने शालेय क्रीडा स्पर्धेत किमान दोन सांघिक व तीन वैयक्तिक क्रीडा प्रकारात सहभागी होणे बंधनकारक आहे.

१०. सांघिक क्रीडा स्पर्धामधील विजयी संघ फक्त पुढील स्तरावरील (राज्यस्तरापर्यंत) पाठविण्यास पात्र ठरतील.

११. वैयक्तिक क्रीडा प्रकारात मैदानी व जलतरण या प्रकारातील अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांकाचे खेळाडू तालुकास्तरापासून राज्य स्तरापर्यंत पाठविण्यात येतील मात्र कुस्ती, ज्युदो, तायक्वाँदो, वेटलिफ्टिंग, बॉक्सिंग, कराटे वुशू किक् बॉक्सिंग या खेळ बाबीतील फक्त प्रथम क्रमांकाचे संघ राज्यस्तरापर्यंत सहभागी होईल.

१२. रिले (जलतरण व मैदानी) स्पर्धेमध्ये फक्त प्रथम क्रमांकाचे संघ पुढील स्तरावरील स्पर्धेसाठी (राज्यस्तरापर्यंत ) पात्र राहतील.

१३. जिम्नॅस्टिक्स् तलवारबाजी, मल्लखांब, धनुर्विद्या, बॅडमिंटन, टेबलटेनिस, लॉन टेनिस, बुद्धिबळ या खेळांमधील गुणानुक्रम निवड करुन खेळाडू पाठविण्यात येतील.

१४. शालेय क्रीडा स्पर्धा त्या त्या खेळाच्या, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय एकविध क्रीडा संघटनांच्या नियमानुसार घेण्यात येती स्थळ व कालपरत्वे उदा. : क्रिकेटमधील ओव्हर्स, फुटबॉल, हॉकीमधील वेळ, लॉनटेनिसमधील सेट संख्या इ. खेळांमध्ये बदल करण्याचे अधिकार आयोजन समितीला राहतील.

१५. स्पर्धेसाठी आवश्यक असणारे क्रीडा साहित्य, संरक्षित साधने, त्या त्या संघाचे राहील. तसेच बॅडमिंटन (शटल्स, क्रिकेट, टेबल टेनिस, लॉन टेनिससाठी बॉल इत्यादी सहभागी होणाऱ्या खेळाडूंचे / संघाचे राहील.)

१६. वजनी गटांच्या क्रीडा प्रकारांमध्ये खेळाडू स्पर्धेच्या प्राथमिक स्तरावर ज्या वयोगटातील वजन गटामध्ये सहभागी हाईल त्यास स्पर्धांच्या पुढील स्तरावर त्याच वजन गटामध्ये सहभागी होणे बंधनकारक राहील. म्हणजेच २ स्तरावरील स्पर्धांच्या मधल्या कालावधीत खेळाडूच्या वजनामध्ये वाढ किंवा घट झाल्यास त्याला त्याचा वजनगट बदलता येणार नाही.

१७. शालेय इतर क्रीडा स्पर्धांमध्ये प्रत्येक खेळाडूंनी स्वतःच्या जबाबदारीवर सहभाग घ्यावा, स्पर्धा दरम्यान कोणत्याही कारणास्तव खेळाडूस कोणतीही दुखापत/इजा झाल्यास अथवा दुर्घटना झाल्यास त्यास संयोजन समिती जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१८. शालेय व इतर क्रीडा स्पर्धा आयोजन करीत असताना जिल्हा, विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी बाहेरुन आलेल्या खेळाडूंची निवास व भोजन व्यवस्था ज्या– त्या शाळेने/मंडळाने/कनिष्ठ महाविद्यालयाने स्वतः करावयाची आहे.

१९. शालेय, व इतर क्रीडा स्पर्धेसाठी तालुका स्तरापासून राज्यस्तरापर्यंत जाण्यायेण्यासाठी येणारा प्रवास खर्च हा ज्या–त्या सहभागी होणाऱ्या शाळेने/मंडळाने/कनिष्ठ महाविद्यालयाने स्वतः करावयाचा आहे. सदरचा खर्च शाळेस मिळणाऱ्या वेतनेत्तर अनुदानातून खर्च करण्यास पात्र आहे.

२०. प्रत्येक स्तरावर सहभागी होत असताना खेळाडूने स्वतःजवळ विहीत नमुन्यातील पात्रता प्रमाणपत्र व त्यावर च स्थितीत पासपोर्ट साईज फोटो चिकटविणे अनिवार्य राहील. फोटोवर व खाली मुख्याध्यापक / प्राचार्य यांची स्वाक्षरी शिक्का असणे बंधनकारक राहील. (पात्रता प्रमाणपत्रावर कोणत्याही प्रकारची खाडाखोड दिसून आल्यास ओळखपत्र नियमबाह्य समजण्यात येईल. त्या त्या वजनगटाचा लाभ मिळणार नाही.)

२१. जिल्हा स्तरापासून पुढील स्तरावर सहभागी होत असताना पात्रता प्रमाणपत्रावर जिल्हा क्रीडा अधिकारी यांची प्रतिस्वाक्षरी असणे बंधनकारक राहील.

२२. शालेय क्रीडा स्पर्धेत १४ वर्षाखालील गटातील खेळाडूंनी स्पर्धेत सहभागी होत असताना शासकीय वैद्यकीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र (वयोगटासंबंधी) असणे अनिवार्य आहे.

२३. स्पर्धेमध्ये सहभागी होत असताना प्रत्येक खेळाडूने त्या–त्या खेळाच्या एकविध खेळाच्या संघटनेने निश्चित केलेले गणवेश (स्पोर्टस् कीट) असणे अनिवार्य राहील.

२४. कोणत्याही स्पर्धकास पात्रता प्रमाणपत्राशिवाय कोणत्याही स्तरावर स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

२५. स्पर्धेदरम्यान वेळोवेळी आवश्यकतेनुसार आयोजक, सामनाधिकारी यांना पात्रता प्रमाणपत्र तपासणीसाठी उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

## २६. संघ / खेळाडू यांचेविरुद्ध दंडात्मक कार्यवाही

अ) विविध स्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या स्पर्धेमध्ये खोटी जन्मतारीख नमूद करुन खालच्या वयोगटात खेळविणे.

ब) खोटे पात्रता प्रमाणपत्र, रहिवासी दाखला इ.

क) दुसऱ्या खेळाडूच्या नावावर अन्य खेळाडू खेळविणे.

ड) शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, संस्थेबाहेरील खेळाडू खेळविणे.

उपरोक्त बाबीनुसार फसवणुक करणाऱ्या संघ / खेळाडूंना बाद ठरविण्यात येईल. तसेच प्राथमिक चौकशीमध्ये फसवणूक केल्याचे सिद्ध झाल्यास संबंधित शाळा/ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक / प्राचार्य / क्रीडा शिक्षक यांचे

विरुद्ध भारतीय दंड संहितेनुसार फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करण्यात येईल किंवा शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या प्रचलित दंड संहितेनुसार पात्र ठरणारी शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.
दंडाची रक्कम – जिल्हास्तर रु. १०००/–, विभागीय स्तर रु. २०००/–, राज्यस्तर रु. ५०००/–

## २७. तक्रार निवारण :–

अ) स्पर्धेच्यावेळी संघव्यवस्थापक, मार्गदर्शक, संघनायक यांना स्पर्धेमधील सहभागी संघ / खेळाडू विरुद्ध तक्रार करावयाची झाल्यास त्याने ती तक्रार लेखी स्वरुपात सामना सुरु असताना अथवा सामना संपल्यानंतर ३० मिनिटांच्या आत ना परतावा तक्रार शुल्कासह संयोजकाकडे सादर करावी.
ब) तक्रार नोंदविल्यानंतर तक्रारीबाबतचे पुरावे तक्रारदाराने १ तासाच्या आत सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा तक्रार फेटाळण्यात येईल
क) तक्रार शुल्क रु. ५००/– सर्वच स्तरावर घेण्यात येईल. त्याची पावती संयोजकाने तक्रारदारास देऊन जिल्हा क्रीडा परिषदेस सदर शुल्क जमा करावे.
ड) पंच व तांत्रिक सदस्यांनी दिलेल्या निर्णयाविरुद्ध कोणतीही तक्रार नोंदवून घेतली जाणार नाही.
इ) तक्रार निवारण समितीने दिलेला निर्णय हा अंतिम राहील व तो सर्वांवर बंधनकारक राहील.
ई) तक्रारदाराने फक्त पात्रता प्रमाणपत्रामध्ये नोंदविलेल्या बाबींवरच तक्रार आक्षेप नोंदविण्यात यावेत.
फ) तक्रार निवारण समितीचे स्वरुप हे त्रिसदस्यांचे राहील. क्रीडा स्पर्धा आयोजनाची जबाबदारी असलेल्या संयोजक त्या त्या स्तरावरील खालीलपैकी तीन सदस्यांची नियुक्ती करावी.

**तालुकास्तरावर :–** १. गटशिक्षणाधिकारी, २. तालुका क्रीडा अधिकारी, ३. क्रीडा अधिकारी, ४. एकविध खेळ जिल्हा– प्रतिनिधी, ५. क्रीडा मार्गदर्शक, ६. त्या खेळातील तज्ञ अनुभवी क्रीडा शिक्षक.

**जिल्हास्तरावर :–** १. जिल्हा क्रीडा अधिकारी किंवा त्यांनी नियुक्त केलेला क्रीडा अधिकारी, २. संबंधित खेळाचे पुरस्कार राष्ट्रीय / राज्यस्तरीय खेळाडू, ३. एकविध खेळ जिल्हा संघटना प्रतिनिधी, ४. क्रीडा मार्गदर्शक, खेळातील तज्ञ अनुभवी क्रीडा शिक्षक.

**विभाग स्तरावर :–** १. विभागीय उपसंचालक किंवा त्यांनी नियुक्त केलेला प्रतिनिधी, २. जिल्हा क्रीडा अधिकारी, ३. एकविध जिल्हा संघटना प्रतिनिधी, ४. क्रीडा मार्गदर्शक, ५. त्या खेळातील तज्ञ अनुभवी क्रीडा शिक्षक, ६. खेळाचे पुरस्कारार्थी /राष्ट्रीय /राज्यस्तरीय खेळाडू.

**राज्यस्तरावर :–** १. विभागीय उपसंचालक किंवा त्यांनी नियुक्त केलेला प्रतिनिधी, २. जिल्हा क्रीडा अधिकारी, ३. एकविध जिल्हा संघटना प्रतिनिधी, ४.क्रीडा मार्गदर्शक, ५. संबंधित खेळाचे पुरस्कारार्थी / राष्ट्रीय / राज्यस्तरीय.

२८. खेळाडूंची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने होणार असल्याने नोंदणी केल्यानंतर जे ओळखपत्र तयार होईल त्याची प्रिंटआऊट तालुका, जिल्हा व विभागस्तर स्पर्धेपर्यंत चालेल. राज्यस्तर स्पर्धेसाठी मराठीतील ओळखपत्रावर आयडेंटीटी साईजचा सद्यस्थितीतील फोटो चिकटवून त्यावर संस्थाप्रमुखांचा शिक्का व स्वाक्षरी आवश्यक आहे. अथवा फोटोच्या ठिकाणी खेळाडूचे छायाचित्र संगणकावरुन स्कॅन करुन घेतले तरी चालेल . छायाचित्र स्कॅन करण्यापूर्वी संबंधित संस्थाप्रमुख यांनी त्या छायाचित्रावर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. सर्व शाळा याद्वारे सूचित करण्यात येते की, ओळखपत्रावरील होणारा आवर्ती खर्च कमी करण्यासाठी स्वाक्षरीकृत संगणकीय असलेली ओळखपत्रे खेळाडूंना पुरवावीत. राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होताना पुस्तिकेतील नमूद इंग्रजी नमुण्यातील ओळखपत्र

३०. विजयी संघांना पुढील स्तरावर सहभागी होणे बंधनकारक आहे. अपरिहार्य कारणास्तव पुढील स्तरावर सहभागी होत नसल्यास स्पर्धेच्या नियोजित तारखेपूर्वी किमान दोन दिवस आधी या कार्यालयास सहभागी न होण्याच्या कारणांसह कळवावे. कोणतीही पूर्व सूचना न देता सहभागी न होणारा संघ/संस्था/शाळा/महाविद्यालय/खेळाडूंवर दंडात्मक करण्यात येईल.

३१. चालूवर्षी स्पर्धांचे आयोजन ऑनलाईन पध्दतीने होणार असल्याने www.mumbaidivsports.com या साईटवर / www.dsoraigad.com या डोमेनवर स्पर्धेचे सविस्तर वेळापत्रक अपलोड करण्यात येईल. सदर वेळापत्रकानुसार संबंधित खेळाची सविस्तर प्रवेशिक विहीत केलेल्या कालावधीतच ऑनलाईन सादर करणे बंधनकारक राहील.

३२. क्रीडा स्पर्धांच्या सुलभ आयोजनासाठी सर्व संघ/खेळाडूंनी स्पर्धा कार्यक्रमाच्या वेळापत्रकानुसार वेळेपूर्वी आपली उपस्थिती नोंदवावी.

३३. सर्व खेळाडूंनी स्पर्धास्थळी मौल्यवान दागिने अथवा वस्तू, रोख रक्कम इत्यादी बाबी आणू नयेत, या वस्तू हरवल्या अथवा चोरी झाल्यास आयोजक जबाबदारी घेणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

३४. स्पर्धेसाठी आलेलया खेळाडूंची मैदानावर, मैदानाबाहेर व निवासस्थळी वर्तवणूक चांगली असणे आवश्यक आहे. बेशिस्त खेळाडू संघास दंडात्मक कार्यवाही करुन पुढील स्तरावर भाग घेण्यास संधी दिली जाणार नाही.

३५. स्पर्धेच्या भाग्यपत्रिका(लॉटस) स्पर्धेच्या दिवशी स्पर्धा स्थळी प्राप्त होतीलच तसेच ते स्पर्धेपूर्वी एकदिवस अगोदर ऑनलाईन उपलब्ध करुन घ्यावेत.

३६. सांघिक क्रीडा स्पर्धेत किमान तीन संघ व वैयक्तिक क्रीडा प्रकारात किमान तीन खेळाडू सहभागी झाल्याशिवाय प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार नाही.

३७. सर्वस्तरावरील स्पर्धा सकाळी आठ वाजता सुरु होतील.

३८. स्पर्धेत सहभागी होणारा खेळाडू हा शाळेचा/संस्थेचा नियमित विद्यार्थी असणे आवश्यक आहे.

३९. क्रिकेट, फुटबॉल व हॉकी खेळाच्या भाग्यपत्रिका स्पर्धेपूर्वी ऑनलाईन उपलब्ध करुन देणेत येतील. आपल्या संघाची स्पर्धा सुरु होण्याच्या वेळेपूर्वी १ तास अगोदर मैदानावर उपस्थिती नोंदवावी.

४०. शालेय, क्रीडा स्पर्धेतील एक किंवा अनेक खेळ, वयोगट बदलण्याचा किंवा करण्याचा निर्णय कार्यालयाने राखून ठेवलेला आहे.

४१. वजन गटाच्या स्पर्धेकरीता खेळाडूंची वजने स्पर्धेच्या ठिकाणी सकाळी ८ ते १० या वेळेत घेण्यात येतील.

४२. स्पर्धेच्या ठिकाणी प्रवेशिकेत नमूद केलेले सर्व खेळाडू मैदानावर उपस्थित असणे बंधनकारक आहे. गैरहजर

खेळाडूंना पुढील सामन्यात अथवा संघ विजयी झाल्यास पुढील स्तरावर सहभागी होता येणार नाही. जेवढे खेळाडू प्रत्यक्ष उपस्थित असतील तेवढ्याच खेळाडूंना पुढील स्तरावर सहभागी होता येईल.

४३. काही तांत्रिक अडचणीमुळे स्पर्धेच्या कार्यक्रमात, स्पर्धेच्या जागेत बदल करण्याचे संपूर्ण अधिकार जिल्हा क्रीडा परिषद, रायगड–अलिबाग ने राखून ठेवलेले आहेत.

४४. प्रवेश अर्ज ऑनलाईन पध्दतीने विहीत कालावधीतच सादर करावेत व स्पर्धेच्या ठिकाणी त्याची एक प्रत द्यावी. तरी उपरोक्त क्रीडा स्पर्धा संहिता नियमावलीचा खेळाडू, क्रीडा शिक्षक, क्रीडा मार्गदर्शक, संयोजक, आयोजक या सर्वांनी काटेकोरपणे पालन करुन सदरील स्पर्धा यशस्वीरित्या आयोजनाकामी सहकार्य करावे.

४५. सर्व प्रकारच्या क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक, क्रीडा शिक्षक/शिक्षिका, संघ व्यवस्थापक यांना ही नियमावली लागू राहील.



## सन २०१८-१९ साठी शालेय, महिला व इतर क्रीडा स्पर्धांसाठी वयोगटनिहाय खेळ व खेळाडू संख्या दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | खेळ | शालेय क्रीडा स्पर्धा वयोगट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १४ वर्षाखालील | | १७ वर्षाखालील | | १९ वर्षाखालील | |
| | | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली |
| १ | आर्चरी (धनुर्विद्या) | ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ |
| २ | ॲथलेटिक्स | १५ | १५ | २२ | २१ | २९ | ३० |
| ३ | ॲक्वेटिक्स (जलतरण) | २७ | २७ | २९ | २८ | २९ | २९ |
| ४ | बॅडमिंटन | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ |
| ५ | बास्केटबॉल | १२ | १२ | १२ | १२ | १२ | १२ |
| ६ | चेस (बुद्धीबळ) | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ |
| ७ | क्रिकेट | १६ | - | १६ | १६ | १६ | १६ |
| ८ | क्रॉसकंट्री | - | - | - | - | ६ | ६ |
| ९ | सायकलिंग | ६ | ६ | ६ | ६ | ६ | ६ |
| १० | डायव्हिंग | २ | २ | २ | २ | २ | २ |
| ११ | फुटबॉल | १८ | १८ | १८ | १८ | १८ | १८ |
| १२ | जिम्नॅस्टिक्स | ६ | ६ | ७ | ७ | ८ | ८ |
| १३ | रिद्मिक जिम्नॅस्टिक | - | ३ | - | ३ | - | ३ |
| १४ | ॲक्रोबॅटिक | - | - | - | - | - | ६ |
| १५ | हॅण्डबॉल | १६ | १६ | १६ | १६ | १६ | १६ |
| १६ | हॉकी | १८ | १८ | १८ | १८ | १८ | १८ |
| १७ | ज्युदो | ७ | ७ | ८ | ८ | ८ | ८ |
| १८ | कबड्डी | १२ | १२ | १२ | १२ | १२ | १२ |
| १९ | खो-खो | १२ | १२ | १२ | १२ | १२ | १२ |
| २० | लॉनटेनिस | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ |
| २१ | टेबल-टेनिस | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ |
| २२ | व्हॉलीबॉल | १२ | १२ | १२ | १२ | १२ | १२ |
| २३ | वेटलिफ्टींग | | - | ८ | ७ | ८ | ७ |
| २४ | कुस्ती (फ्रीस्टाईल) | ०८ | - | १० | १० | १० | ८ |
| | कुस्ती (ग्रीकोरोमन) | - | - | - | - | १० | - |
| २५ | तायक्वांदो | ११ | ११ | १० | १० | ८ | ८ |

## सन २०१८-१९ साठी शालेय, महिला व इतर क्रीडा स्पर्धांसाठी वयोगटनिहाय खेळ व खेळाडू संख्या दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | खेळ | शालेय क्रीडा स्पर्धा वयोगट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १४ वर्षाखालील | | १७ वर्षाखालील | | १९ वर्षाखालील | |
| | | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली |
| २६ | वॉटरपोलो | - | - | - | - | १३ | - |
| २७ | बॉक्सिंग (मुष्टीयुद्ध) | ११ | - | १३ | १३ | ११ | १३ |
| २८ | फेन्सिंग (तलवारबाजी) | १२ | १२ | १२ | १२ | १२ | १२ |
| २९ | सॉफ्टबॉल | १६ | १६ | १६ | १६ | १६ | १६ |
| ३० | बेस बॉल | १६ | १६ | १६ | १६ | १६ | १६ |
| ३१ | योगा | ७ | ७ | ७ | ७ | ७ | ७ |
| ३२ | शुटींग (नेमबाजी-एअर वेपन) | ४ | ४ | ४ | ४ | ४ | ४ |
| ३३ | रोलर स्केटिंग | ११, १४, १७, १९ वर्षाआतील मुले-मुली (खेळाडू संख्या प्रत्येकी ३-३) | | | | | |
| ३४ | रोलर हॉकी | १९ वर्षे वयोगटातील मुले फक्त (खेळाडू संख्या -१०) | | | | | |
| ३५ | सुब्रतो मुखर्जी कप फुटबॉल | १४ वर्षे वयोगटातील मुले, १७ मुले मुली (खेळाडू संख्या -१६) | | | | | |
| ३६ | सब ज्युनिअर नेहरु कप हॉकी | १५ वर्षाआतील मुले (खेळाडू संख्या -१६) | | | | | |
| ३७ | ज्युनियर नेहरु कप हॉकी | १७ वर्षाआतील मुले / मुली (खेळाडू प्रत्येक संघात १६) | | | | | |
| ३८ | किक बॉक्सिंग | १४, १७, १९ वर्षाआतील मुले-मुली वजनगटाप्रमाणे | | | | | |
| ३९ | नेट बॉल | १४, १७, १९ वर्षाआतील मुले-मुली (१२ खेळाडू) | | | | | |
| ४० | सिकई मार्शल आर्ट | १४, १७, १९ वर्षाआतील मुले-मुली | | | | | |
| ४१ | रोल बॉल | १४, १७, १९ वर्षा खालील मुले-मुली (१२ खेळाडू) | | | | | |
| ४२ | डॉजबॉल | १९ वर्षाखालील मुले-मुली (१० खेळाडू) | | | | | |
| ४३ | मल्लखांब | १४, १७, १९ वर्षा खालील मुले-मुली | | | | | |
| ४४ | कॅरम | १४, १७, १९ वर्षाखालील मुले-मुली | | | | | |
| ४५ | बॉल बॅडमिंटन | १४, १७, १९ वर्षा खालील मुले-मुली ( खेळाडू ८-८) | | | | | |
| ४६ | स्क्वॅश | १७,१९ वर्षे मुले/मुली (खेळाडू ४-४) | | | | | |
| ४७ | कराटे | १४, १७, १९ मुले/मुली (वजन गटाप्रमाणे ) | | | | | |
| | | | | | | | |

# NATIONAL SCHOOL GAMES 2018-19
## (Under the aegis of School Games Federation of India)

Latest Photo name with date duly attested by the Principal/ Head Master with stamp

State-Maharashatra

Age Group under................Boys / Girls

## Certificate of Eligibility

AADHAR NO.

| | | |
|---|---|---|
| 01 | Name of the Participants (In Block Letters) | |
| 02 | Father's Name (In Block Letters) | |
| 03 | Name of the School / College. | |
| 04 | Full address of the School / College. | |
| 05 | Phone No. of the School / College | |
| 06 | Last Year Registration No. SGFI | |
| 07 | Date of Birth (In Fig.)<br>In Words | |
| 08 | Discipline | |
| 09 | Passport No. (If available) | Month Day Year |
| 10 | Age in completed years as 31 st December | |
| 11 | Home Address in full & Phone No/ Mob. No. | |
| 12 | Registration No. & year | |
| 13 | Date of Joining the School | |
| 14 | Standard & section Studying this year | |
| 15 | Standard studying Last Year | |
| 16 | Personal Identification Marks. | 1.<br>2. |
| 17 | Signature of the Participants | |

Certificate : 1) Certified that the above Participant is a Bonafide Student of this School / College for the Academic year.

2) Certified that I have personally verified the admission records maintained in the school and found correct.

3) Certified that It is understood in the event of information furnished above found to be partly or wholly untrue the above students is lilable to be disqualified for a period of two years in case the students is a member if the team then the participants is liable to be disqualified as a whole.

Signature of competent Authority of State/Ut/Unit with Seal

Signature with Seal/ Manager/Coach

Signature with Seal/ Of the Head Master/Principal

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड

## शालेय क्रीडा स्पर्धा नियम पुस्तिका, सन २०१८-१९



राज्यस्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धेचे छायाचित्र



राष्ट्रीय युवा दिन व युवा सप्ताह



जिल्हास्तरीय युवा महोत्सव




जिल्हास्तरीय युवा महोत्सव



क्रीडा शिक्षक प्रशिक्षण शिबीर



वृक्षारोपण-जिल्हाक्रीडा संकुल, रायगड-अलिबाग

प्रेषक :-
जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रायगड
जिल्हा क्रीडा संकुल, संगम, पो. वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड. पिन. ४०२ २०१.
ई.मेल. : dsoraigad.2009@rediffmail.com / dsoraigad.dsys-mh@gov.in